स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

मानव्य विज्ञान विद्याशाखे अंतर्गत राज्यशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती
(पीएच.डी) पदवीसाठी सादर करण्यात आलेला अंतिम संशोधन आराखडा

हिंगोली जिल्हाअंतर्गत विधानसभा मतदार संघातील राजकीय नेतृत्वाच्या विकासात्मक कार्य संपादनुकीचे विश्लेषणात्मक अध्ययन
(संदर्भ :१९९९ –२००९)

★ संशोधक ★

गजानन प्रल्हाद चव्हाण

आदर्श महाविद्यालय,हिंगोली

★ मार्गदर्शक ★

प्रा.डॉ.डी.आर.भागवत

राज्यशास्त्र विभागप्रमुख (सेवानिवृत्त)

सहयोगी प्राध्यापक व संशोधक मार्गदर्शक

कमलताई जामकर महिला महाविद्यालय,परभणी

★ सह - मार्गदर्शक ★

प्रा.डॉ.आर.डी. शिंदे

राज्यशास्त्र विभागप्रमुख

लोकमान्य महाविद्यालय,सोनखेड जि. नांदेड

★ संशोधन केंद्र ★

ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी

मार्च - २०२४

अंतिम संशोधन आराखडा

हिंगोली जिल्हाअंतर्गत विधानसभा मतदार संघातील राजकीय नेतृत्वाच्या विकासात्मक कार्य संपादनुकीचे विश्लेषणात्मक अध्ययन (संदर्भ :१९९९ -२००९)

१.१ प्रस्तावना (Introduction)

मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे. त्यामुळे त्याच्या समाजप्रियतेचा स्वाभाविक परिणाम सामुदायिक जीवनात झाला आहे. समाजशील व समाजप्रिय प्रवृत्तीमुळे त्याने समाजात राहून स्वत:चे जीवन सुखी व समृद्ध केले आहे. मनुष्याला मानसिक, वैचारिक, सांस्कृतिक आणि भौतिक प्रगतीसाठी व्यक्तीला समाजावर अवलंबून राहावे लागते. जीवनात दैनंदिन गरजा भागविण्यासाठी माणसाला इतर माणसांची मदत घ्यावी लागते आणि तडजोडीच्या वृतीने इतराबरोबर सहकार्य करून एकत्रित म्हणजे गटागटाने राहावे लागते. समाजात अनेक व्यक्तीचे गट भौतिक विकासासाठी स्थापन झालेले असतात. त्यामागे व्यक्तिविकास हा उद्देश असतो. सामाजिक संघटना आणि संस्था ही त्याच्या विकासाची साधने आहेत. व्यक्तीमध्ये समूहाने राहण्याची नैसर्गिक प्रवृती दिसून येते. मानवेतर प्राण्यामध्ये कमी-अधिक प्रमाणात अशी प्रवृत्ती असल्याचे आढळून येते. अनेक व्यक्ती एकत्र आल्यामुळे सामूहिक जीवन जास्त सुरक्षित व सुखकर असल्याचे अनुभवाला आले. सामूहिक जीवनाचे काम व्यक्तीला अन्न, निवारा, संरक्षण अशा प्रकारच्या गरजा भागविणे आवश्यक असल्याने त्याने सामूहिक जीवनाचा मार्ग स्वीकारला. एकमेकाच्या मदतीने आवश्यक साधने, वस्तु मिळवता येतात. दैनदिन गरजा भागविता येतात. सरक्षणाच्या दृष्टीने समाजात राहणे उपयुक्त ठरते. पशु, नैसर्गिक आपत्ती यापासून सरक्षण मिळत. सामूहिक जीवनामुळे कामाची विभागणी होते. श्रमविभागाचे अनेक फायदे मिळतात. अनुभवाच्या व ज्ञानाच्या देवाणघेवाणीमुळे मानसिक व वैचारिक उन्नती शक्य झाली. समाजाला उपयुक्त असलेल्या प्रथा चागल्या मानल्या. त्यांचे

अनुकरण समाजामुळे शक्य झाले. सामूहिक जीवनात इतर माणसाबरोबर राहावे लागल्यामुळे व्यक्तीला स्वतःच्या वर्तनावर स्वतःच निर्बंध घालून घेण्याचे शिक्षण आपोआप मिळाले. त्याच्या विघातक प्रवृतीस आळा बसला. इतराने दु:ख अडचणी समजावून घेऊन त्याचा परिहार करण्यासाठी इतराना मदत करण्याची प्रवृनी दृढमूल होऊन माणूस सस्कारक्षम सुसंस्कृत बनला. सामूहिक जीवनामुळे व्यक्तिविकासासाठी व्यक्तिस्वात्र्य प्राप्त झाले. व्यक्तीला समाजात राहताना बंधनविरहित स्वातंत्र्य उपभोगता येत नाही तर बंधनासहित स्वातंत्र्य उपभोगावे लागते. म्हणून समाजाचे सहकार्य आणि सहानुभूती मिळते. व्यक्तीचा विकास होण्यासाठी समाज संधी प्राप्त करून देतो. म्हणून व्यक्तिविकासासाठी स्वातंत्र्याची आवश्यकता असते. व्यक्ती आणि समाज या दोहोंच्या हिताच्या दृष्टीने समाज व्यक्तीवर अप्रत्यक्ष आणि प्रत्यक्ष नियंत्रणे आणि निर्बंध घालत असतो. व्यक्तीवर सामाजिक आचार-विचार, चालीरिती, रूढी, परंपरा, लोकमत, निती नियम, इत्यादी गोष्टींचा प्रभाव पडतो व सामाजिक बंधनांची जाणीव होते. समाज अनेक संस्था, संघटना मिळून झालेला असतो त्या संघटना आणि समाज व्यक्तीच्या विकासासाठी आवश्यक असतात. त्यामुळे व्यक्तीला त्यांच्या मदतीने आपल्या गरजा भागविता येतात. ह्या संस्था, संघटना व्यक्तीकडून स्थापन केल्या जातात. ह्या संस्था व्यक्ती विकासासाठी उपयुक्त कार्य करतात. म्हणून व्यक्ती निरनिराळ्या संस्थांचे आणि संघटनांचे सभासदत्व स्वीकारत असते. विशिष्ट उद्देशाने प्रेरित होऊन कुटुंबसंस्था, विवाहसंस्था, धर्मसंस्था, राज्यसंस्था व्यक्तींनीच निर्माण केल्या आहेत.मनुष्याने स्वत:च्या विकासासाठी अनेक संस्था स्थापन केल्या. मनुष्याने विकासाबरोबरच अनेक संस्थाचे परस्परांशी आणि व्यक्तींचे संस्थांशी संबंध कसे असावेत ह्या बाबतीत आवश्यक असलेले नियम तयार करणे, ते कार्यवाहीत आणणे, सामूहिक जीवनाचे नियंत्रण करणे, इत्यादी कार्य करण्यासाठी विशिष्ट प्रकारच्या संस्थेची गरज भासू लागली या अडचणीतून राज्य किवा राज्यसंस्था निर्माण झाली. ॲरिस्टॉटल यांच्या मते, "राज्य म्हणजे अनेक कुटुबे आणि

खेडी मिळून झालेला आणि संपूर्ण व स्वयंपूर्ण जीवन म्हणजेच सुखी आणि प्रतिष्ठित जीवन हे ध्येय असलेला संघ होय.

लोकशाही हा शासन संस्थेच्या अनेक प्रकारापैकी एक महत्वाचा प्रकार आहे. आधुनिक काळातील लोकशाही शासन पद्धतीला अधिकाधिक मान्यता मिळत गेली असून जगातील बहुसंख्य राज्यांनी तिचा अंगिकार केला आहे. कायदेमंडळ, कार्यकारीमंडळ, न्यायमंडळ अशा तीन शाखामध्ये या शासन पद्धतीचे सत्ता विभाजन झालेले असून, त्यात कायदेमंडळाला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. अब्राहम लिंकन यांनी म्हटल्याप्रमाणे, "लोकांचे, लोकांनी आणि लोकांसाठी चालविलेले शासन म्हणजे लोकशाही होय. लोकांचे प्रतिनिधी कायदेमंडळात एकत्रित येऊन देशाचे धोरण ठरवित असतात. तसेच कार्यकारी मंडळावर नियंत्रण ठेवून जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी तत्पर असतात.

भारताने संघराज्य शासन पद्धतीची रचना स्वीकारली आहे. राज्यकारभाराच्या सोयीसाठी २८ घटकराज्ये आणि 9 केंद्रशासीत प्रदेश निर्माण केले आहेत. भारतीय राज्यघटनेच्या १६८ व्या कलमात असे स्पष्ट करण्यात आले आहे की, प्रत्येक घटकराज्याच्या विधीमंडळात राज्यपाल आणि एक किंवा दोन सभागृहांचा समावेश असेल. एकगृह कायदेमंडळ पद्धती आणि द्विगृहात्मक कायदेमंडळ पद्धती अशा दोन्ही पद्धती भारतात रूढ आहेत. घटक राज्यातील कनिष्ठ गृहाला विधानसभा आणि वरिष्ठ गृहाला विधान परिषद असे म्हणतात.

भारतीय राज्यघटनेच्या १७० व्या कलमानुसार प्रत्येक घटक राज्यात विधानसभा निर्माण केलेली आहे. विधानसभा हे कनिष्ठ सभागृह आहे. घटक राज्यातील जनतेचे प्रतिनिधीत्व करीत असते. लोकशाही व्यावस्थेत राजकीय नेतृत्वास विशेष महत्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. कारण राजकीय नेतृत्वाचा प्रभाव समाजातील प्रत्येक घटकांवर कमी अधिक प्रमाणात पडत असल्याने राजकीय नेतृत्वाचा अभ्यास महत्वाचा ठरतो. राजकीय नेतृत्वाचा अर्थ स्पष्ट करतांना ॲरिस्टॉटलने “The Politics” या ग्रंथात "राजकीय

नेतृत्वामध्ये तीन गुणांचा समावेश असणे आवश्यक असून ती म्हणजे इथॉस (Ethos), पॅथॉस (Pathos), लॅगॉस (Lagos) या तीन गुणांनी युक्त असणारी व्यक्ती नेतृत्व करण्यास पात्र असते" असे म्हटले आहे. कोणत्याही जनसमुहाला त्यांच्या विकासासाठी समर्थ नेतृत्वाची आवश्यकता असते. या नेत्यांच्या पुढाकाराने त्यांचा आदर्श आणि त्यांनी केलेले मार्गदर्शन या आधारावरच कोणताही समाज प्रतिकुल परिस्थितीतून मार्ग काढू शकतो व आपला विकास साध्य करू शकतो. म्हणजेच कर्तबगार नेतृत्वावरच कोणत्याही जनसमुहाचा विकास अवलंबून असतो. तसेच नेतृत्व हे निर्माण होणा-या समस्या सोडविणारे तथा वेळावेळी मार्गदर्शन करणारे असते. ते समाजाच्या मध्यवर्ती असून समाजाचा केंद्रबिंदू आहे.

राजकारण, धर्मकारण, व्यापार, उद्योग, संघटना, समित्या, संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था इत्यादी अनेक क्षेत्रात सक्षम नेतृत्वाची मोठी उणीव आढळून येत आहे. राजकीय नेतृत्व प्रबळ इच्छा शक्तीने युक्त असावे लागते. बिकट परिस्थितीत किंवा कसोटीच्या वेळी त्वरीत निर्णय घेऊन आपली भूमिका स्पष्ट करून समर्थपणे मार्ग काढणारे असले पाहिजे. नेतृत्वाने आपल्याबरोबर समाजालाही पुढे नेले पाहिजे. प्रसंगी कर्तव्य कठोर , निःपक्षपाती आणि न्यायनिष्ठुर असतांनाच इतरांना त्याचे म्हणणे योग्य वाटेल किंवा वाटणार नाही. अशा स्थितीत लढाईच्या वेळी खंबीरपणे उभा राहणारा नेता स्वतःचे सर्वोच्च स्थान निर्माण करत असतो.

आधुनिक काळात राज्यकर्ते, शासनकर्ते किंवा नेतृत्व हो संकल्पना अधिक स्पष्ट झालेली आहे. समाजातील प्रत्येक घटकास नेतृत्वाची आवश्यकता असते. यामध्ये प्रामुख्याने राजकीय नेतृत्व समाजात प्रभावी ठरत असलेले दिसून येते. सत्ता स्पर्धेत प्रत्यक्ष सहभाग घेऊन राज्य संस्थेतील भीत्र पातळीवरील सत्ता पदे प्राप्त करण्याचा प्रयत्न राजकीय नेतृत्व करत असते. मात्र यातील काही वरच्या सत्ता स्थानापर्यंत पोहचतात. या प्रक्रियेस राजकीय भरती असे म्हटले जाते. तसेच पूर्वीचे अनेक नेतृत्व यातून बाहेर

पडतात यास राजकीय श्रेष्ठजनांचे राजकीय अभिसरण म्हटले जाते. समाजात ही प्रक्रिया निरंतरपणे सुरू असते. आजच्या लोकशाही व्यवस्थेत हि प्रक्रिया कशा प्रकारे पूर्ण होत आहे याचा अभ्यास करण्यासाठी सदरील विषय महत्वाचा आहे.

स्वातंत्र्यानंतर भारतात संघराज्य व्यवस्थेचा स्विकार करण्यात आला असून भाषेच्या आधारावर अनेक घटकराज्यांची निर्मिती करण्यात आली आहे. केंद्राप्रमाणेच घटकराज्यामध्येही कायदे मंडळाची निर्मिती केली असून त्या अंतर्गत विधानसभा व विधान परिषद असे दोन सभागृह निर्माण केले आहेत. विधानसभा या सभागृहात जनतेने प्रत्यक्ष मतदानाने निवडून दिलेले प्रतिनिधी असतात. विधानसभेतील सदस्यांचा जनतेशी प्रत्यक्ष संबंध येत असतो. यामुळे विधानसभा सदस्याने केलेल्या कार्याचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. हे लक्षात घेउन हिंगोली जिल्हांतर्गत विविध विधानसभा मतदार संघातील राजकीय नेतृत्वाने १९९९ ते २००९ या कालावधीत केलेल्या विकासात्मक कार्य संपाद्नुकीचा अभ्यास प्रस्तुत शोध प्रबंधात केला आहे. त्यात प्रामुख्याने त्यांच्या राजकीय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, कृषी, सहकार आदी कार्याचा आढावा घेतला आहे.

१.२ संशोधन समस्या (Research Problem)

१) हिंगोली जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघातील राजकीय नेतृत्वाच्या उदयासाठी त्यास मिळणा-या प्रेरणा व नेमकी परिस्थिती कोणती होती ते शोधणे.

२) हिंगोली जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघातील राजकीय नेतृत्व राजकीय व प्रशासकीय भूमिका कशाप्रकारे पार पाडू शकते ते तपासणे.

३) हिंगोली जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघातील राजकीय नेतृत्वाचे नेतृत्व गुण व या नेतृत्व गुणांचा विकास कशा प्रकारे झाला ? या बाबींचा शोध घेणे.

४) हिंगोली जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघातील राजकीय नेतृत्वाने राजकीय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, कृषी, सहकार आदी क्षेत्रात मतदारसंघाच्या विकासास कितपत चालना मिळाली आहे या बाबींचा शोध घेणे.

५) हिंगोली जिल्हयातील विधानसभा मतदारसंघातील राजकीय नेतृत्व जनतेमधून निर्माण झाले असल्यामुळे या नविन नेतृत्वाने कोणते कार्य केले किंवा जनतेच्या अपेक्षा कितपत पूर्ण केल्या या बाबींचा शोध घेणे.

१.३ संशोधनाचं महत्त्व

हिंगोली जिल्हयातील विधानसभा मतदार संघातील राजकीय नेतृत्वाने प्रतिनिधीत्वाची संधी मिळाल्याने त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक,आर्थिक व राजकीय स्थितीत व मतदारसंघाच्या विकासास कितपत चालना मिळाली आहे. यांचा अभ्यास प्रस्तुत संशोधनातून केला आहे. तो शासनाला जिल्हयातील परिस्थिती समजून घेण्यास मार्गदर्शक ठरु शकेल आणि शासनाला जिल्हयातील विविध धोरणं ठरविणे व उपाययोजना करणे शक्य होईल. राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरण किंवा सत्तेचे वाटप हा लोकशाहीचा पाया आहे. सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या दृष्टीकोनातून भारतामध्ये मध्यवर्ती सत्ता (केंद्र सरकार), प्रांतीय सत्ता (राज्य सरकार) आणि स्थानिक स्वराज्य संस्था असे तीन विभाग निर्माण करण्यात आलेले आहेत. वरील तीनही विभाग परस्परांशी अविभाज्यपणे जोडले गेलेले आहेत. या माध्यमातून समाजात एका नविन नेतृत्वाची निर्मिती झाली. हे नेतृत्व जनतेमधून निर्माण झाले असल्यामुळे जनतेला या नेतृत्वाकडून अनेक अपेक्षा होत्या. त्यामुळे निर्माण झालेल्या नविन नेतृत्वाने कोणते कार्य केले किंवा जनतेच्या अपेक्षा कितपत पूर्ण केल्या या दृष्टीने हा अभ्यास महत्वाचा आहे.

१.४ उद्‌दिष्ट्ये

सामाजिक संशोधन करीत असतांना संशोधकाला संशोधन विषय निश्चित झाल्यानंतर संशोधनाचे उद्‌देश निश्चित करावे लागतात. उद्‌देश निश्चितीमुळे संशोधन कार्याला दिशा प्राप्त होत असते.

१) हिंगोली जिल्हयातील तिन्ही विधानसभा मतदारसंघातील राजकीय नेतृत्वाच्या कार्य संपादणुकीचा अभ्यास करणे.

२) हिंगोली जिल्हयातील तिन्ही विधानसभा मतदारसंघातील राजकीय नेतृत्वाने स्थानिक पातळीवर घडवून आणलेल्या विकास कार्याचा शोध घेणे.

३) हिंगोली जिल्हयातील तिन्ही विधानसभा मतदारसंघातील राजकीय नेतृत्वाच्या कार्य संपादणुकीचा तुलनात्मक अभ्यास करणे.

४) विधानसभेतील नेतृत्वास विकास कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी शासन पुरेसे प्रशासकीय अधिकार, अर्थ सहाय्य देते का व त्या अर्थसहाय्याचा वापर नेतृत्वाद्वारे कशा प्रकारे केला जातो ते अभ्यासणे.

५) हिंगोली जिल्हयातील तिन्ही विधानसभा मतदारसंघातील नेतृत्व कार्य करीत असतांना लोकभावना लक्षात घेऊन कार्य करते का हे जाणून घेणे.

६) हिंगोली जिल्हयातील तिन्ही विधानसभा मतदारसंघातील राजकीय नेतृत्वाच्या कार्यामुळे मतदारसंघाच्या विकासास कितपत न्याय मिळाला हे जाणून घेणे.

१.५ गृहितकृत्ये

१) विधानसभेतील नेतृत्वाला कार्य करतांना अनेक अडचणी येतात.

२) नेतृत्वाने राबविलेल्या विकास योजनांचा लाभ संबंधित घटकांपर्यंत पोहचत नाही.

३) विधानसभेतील नेतृत्वास विकास कामासाठी पुरेसा निधी व अधिकार उपलब्ध होत नाही तसेच हे नेतृत्व मिळालेल्या निधीचा योग्य क्षमतेने वापर करू शकत नाही.

४) विधानसभेतील नेतृत्व विकास कार्यक्रम आखत असतांना त्यात पक्षीय राजकारण व हितसंबंधांना प्राधान्य देते.

५) स्वातंत्र्यानंतर स्वीकारलेल्या नविन राजकीय व्यवस्थेने सर्वसामान्य नागरिकांना राजकीय नेतृत्व करण्याची संधी प्राप्त करून दिली आहे.

१.६ संशोधनाचे कार्यक्षेत्र

भारतामध्ये स्वातंत्र्यानंतर संसदीय शासन प्रणालीचा स्वीकार करण्यात आला. तसेच स्थानिक भागाच्या विकासासाठी व स्थानिक पातळीवरील प्रश्न स्थानिक पातळीवरच

सोडवण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांचा स्वीकार करण्यात आला. ७३ व ७४ व्या घटनादुरूस्तीने समाजातील सामाजिक दृष्ट्या सर्वच उपेक्षीत घटकांना राजकीय क्षेत्रात कार्य करण्याची संधी मिळवून दिली. आजच्या स्थितीत देशाला स्वातंत्र प्राप्त होऊन ७६ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. इतक्या मोठ्या कालावधीला गृहित धरून कार्य करणे सहज शक्य नाही. त्यामुळे हा अभ्यास केवळ हिंगोली जिल्हांतर्गत असणाऱ्या विधानसभेतील राजकीय नेतृत्वाचा केला जाणार आहे. यामध्ये प्रामुख्याने हिंगोली, कळमनुरी, वसमत या तीन विधानसभा मतदार संघातील राजकीय नेतृत्वाने केलेल्या कार्य संपादणूकीचा विश्लेषणात्मक अभ्यास करून त्याचा कालावधी १९९९-२००९ असणार आहे.

१.७ संशोधन विषयाच्या मर्यादा

१) प्रस्तुत संशोधन कार्यास काही व्यक्ती, स्थळ व काळाच्या मर्यादा आहेत.

२) हे व्यक्तीच्या कार्यावर आधारीत आहे.

३) विधानसभा सदस्य यांच्या कार्यावर यापूर्वी संशोधीत स्वरूपाचे लिखाण उपलब्ध नाही.

४) प्रस्तुत संशोधनाचे अभ्यास क्षेत्र महाराष्ट्रातील एकूण २८८ विधानसभा मतदारसंघापैकी हिंगोली जिल्यातील ०३ विधानसभा मतदारसंघ आहे.

५) हिंगोली जिल्यातील ०३ विधानसभा मतदारसंघाचा १९९९ ते २००९ या काळातील लोकप्रतिनिधींच्या कार्यसंपादणुकीचा अभ्यास करण्यात आला आहे.

६) प्रस्तुत संशोधनात वरील वस्तुस्थितीमुळे संशोधनाचा भर अधिकाधिक तथ्यांच्या प्राथमिक स्त्रोतांवर देण्यात आला आहे. अर्थात आवश्यक तेथे द्वितीयक स्त्रोताव्दारेही तथ्य संकलित करण्यात आली आहे.

१.८ संशोधन पद्धती

हिंगोली जिल्हाअंतर्गत विधानसभा मतदार संघातील राजकीय नेतृत्वाच्या विकासात्मक कार्य संपादनुकीचे विश्लेषणात्मक अध्ययन (संदर्भ:१९९९-२००९) या प्रस्तुत

संशोधन विषयाच्या अभ्यासासाठी सामाजिक शास्त्रातील संख्यात्मक व गुणात्मक पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे. सदरील संशोधनामध्ये क्षेत्रिय अध्ययन, स्पष्टीकरणात्मक, तुलनात्मक, विश्लेषणात्मक व वर्णनात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

१.९ नमुना निवड : (Sampling)

प्रस्तुत संशोधनाचा विषय **हिंगोली जिल्हाअंतर्गत विधानसभा मतदार संघातील राजकीय नेतृत्वाच्या विकासात्मक कार्य संपादनुकीचे विश्लेषणात्मक अध्ययन (संदर्भ :१९९९ -२००९)** हा आहे. हिंगोली जिल्ह्यात हिंगोली, वसमत, कळमनुरी, औढा नागनाथ ,सेनगाव अशी ५ तालुके आहेत. परंतु जिल्हा लहान असल्याने हिंगोली, वसमत, कळमनुरी हे तीन विधानसभा मतदारसंघ आहेत. या तिन्ही विधानसभा मतदारसंघातील मतदारसंघनिहाय ६० नागरिकांची नमुना निवड यदृच्छिक नमुना निवड पध्दतीमधील सहेतुक नमुना निवड पध्दतीने करण्यात आली होती . यासाठी मुलाखत अनुसूची या तंत्राचा उपयोग करण्यात आला आहे.तसेच या विधानसभा मतदारसंघातून ११९९, २००४ च्या विधानसभा निवडणुकीत निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींकडून मुलाखत अनुसूचीद्वारे तथ्य संकलीत करण्यात आली आहेत .

१. १० तथ्य संकलन

हिंगोली जिल्हा अंतर्गत विधानसभा मतदार संघातील राजकीय नेतृत्वाच्या विकासात्मक कार्य संपादनुकीचे विश्लेषणात्मक अध्ययन (संदर्भ :१९९९ -२००९) प्रस्तुत संशोधन विषयावर संशोधन करीत असतांना संशोधकाने तथ्यसंकलन करण्यासाठी प्राथमिक व द्वितीय स्त्रोतांचा उपयोग केला आहे.

१.१ प्राथमिक तथ्य संकलन

प्राथमिक तथ्य संकलन याचा अर्थ अगदी प्रथम प्रयत्नातून गोळा केलेली माहिती होय. संशोधक आपल्या संशोधन क्षेत्रात जाऊन त्या विषय किंवा समस्येच्या संबंधात जिवंत व्यक्तीकडून मुलाखत, अनुसूची किवा प्रश्नावलीच्या च्या सहाय्याने किया प्रत्यक्ष

निरीक्षणाव्दारे जो माहिती किवा तथ्य जमा करतो. त्याला प्राथमिक तथ्य संकलन असे म्हणतात. प्रस्तुत संशोधनाचे भौगोलिक क्षेत्र हिंगोली जिल्हा आहे. जिल्हयातील पाच तालुक्यात उत्तरदाते विखुरलेले आहेत. त्यामुळे त्यांच्याशी व्यक्तिगत संपर्क साधून तथ्य संकलन करणं वेळ आणि आर्थिक दृष्टीने सोयीचे होत नाही. म्हणून सदर संशोधनासाठी संशोधकाने तथ्य संकलनासाठी मुलाखत अनुसूची व प्रत्यक्ष निरीक्षण पध्दतीचा अवलंब केला आहे. प्रत्यक्ष मुलाखत व निरिक्षण या प्राथमिक स्त्रोतांद्वारे तथ्ये संकलित केली आहे. यासाठी प्रत्यक्ष विधानसभा सदस्य यांच्या मुलाखत अनुसूचीमधून व नागरिकांकडून मुलाखत अनुसूचीव्दारे त्यांनी केलेल्या कार्याचे निरिक्षण करून तथ्य संकलित करण्यात आली आहेत.

१.९.२ व्दितीय तथ्यसंकलन

व्दितीय स्त्रोताअंतर्गत कार्यालयीन कागदपत्रे, संदर्भग्रंथ, पूर्व संशोधीत साहित्य, वर्तमानपत्रे, मासिके, साप्ताहिके, नियतकालिके, शासकीय अहवाल, गॅझेट इत्यादी स्त्रोतांचा उपयोग करून तथ्ये संकलित करण्यात आला आहे.

१.१० तथ्य विश्लेषण (Data Analysis)

संशोधन प्रक्रियेत तथ्य संकलनाला फार महत्व असते. एखादया सामाजिक विषयाबाबत संशोधनाच्या हेतूने गोळा केलेली माहिती म्हणजे तथ्य संकलन होय. सामाजिक संशोधनात तथ्यांचे संकलन केल्यानंतर त्यांचे विश्लेषण व निर्वचन करणे आवश्यक आहे. जोपर्यंत तथ्याचे विश्लेषण आणि निर्वचन करीत नाही तोपर्यंत ती तथ्य अर्थहिन असतात. परंतु विश्लेषण आणि निर्वचनानंतर तथ्यांना एक वेगळा अर्थ प्राप्त होतो. संशोधकाने हे कार्य शास्त्रीय पध्दतीने केले आहे. संकलित तथ्यांच विश्लेषण आणि निर्वचन करण्यासाठी वर्गीकरण आणि सारणीकरण या तंत्राचा उपयोग केला आहे.

१.११ पूर्व संशोधन साहित्याचा आढावा (Review of Literature)

हिंगोली जिल्हाअंतर्गत विधानसभा मतदार संघातील राजकीय नेतृत्वाच्या विकासात्मक कार्य संपादनुकीचे विश्लेषणात्मक अध्ययन (संदर्भ :१९९९ -२००९) या विषयावर संशोधन करीत असताना विषयाच्या अनुषगाने यापूर्वी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष सबंधित असलेल्या साहित्याचे निरनिराळे सदर्भ ग्रंथ, पुस्तके, शासकीय दस्ताऐवज, वर्तमानपत्रे इत्यादी साहित्याचा अभ्यास केल्यामुळे यातून अमूल्य माहिती प्राप्त झाली

१) **अजय गव्हाणे**

यानी लिहिलेला "संसदीय लोकशाहीची आयुधे" हा ग्रथ विधिमंडळ कामकाज कसे चालते हे समजून घेण्यासाठी उपयुक्त आहे. या ग्रथामध्ये पाच प्रकरणे आहेत. त्यामध्ये पहिल्या प्रकरणात संसदीय लोकशाहीचा उगम व विकास यावर प्रकाश टाकणारे आहे .तर दुसरे प्रकरण हे संकल्पना, स्वरूप आणि गाभा तत्वे स्पष्ट करणारे आहे. तिसरे प्रकरण भारतीय संसदेच्या संरचना व कार्य प्रणालीवर प्रकाश टाकणारे आहे. चौथ्या प्रकरणात संसदीय लोकशाहीची आयुधे स्पष्ट केली आहेत. त्यामध्ये प्रश्नोत्तराचा तास, प्रश्नोतराचे विविध प्रकार, लक्षवेधी, अल्पकालीन चर्चा, अंतिम आठवडा, अविश्वास प्रस्ताव, विश्वासदर्शक प्रस्ताव, ठराव व अभिनंदन प्रस्ताव इत्यादी आयुधे चर्चिली आहेत. लोकप्रतिनिधींची विधीमंडळातील कामगिरी समजून घेण्यासाठी आयुधाचे हे आकलन मार्गदर्शक ठरणारे आहे. अंतिम प्रकरणात लेखकाने असे म्हटले आहे की, प्रश्नोत्तराचा तास हे संसदीय शासन पद्धतीतील जबाबदारीचे तत्व राबविण्याचे महत्त्वाचे असले तरी बराचसा वेळ सत्तारूढ व विरोधी पक्षातील शह-काटशहाच्या राजकारणात खर्च होतो. लोकप्रतिनिधी विधीमंडळात प्रश्नोत्तराच्या तासात कसा भाग घेतात. तसेच कोणत्या गुणांचा उपयोग करतात हे समजून घेण्यासाठी हा ग्रंथ उपयुक्त आहे.

२) **डॉ. फुलारी रा.ना.**

यांनी लिहिलेला महाराष्ट्र विधिमंडळ कार्यभाग नागपूर अधिवेशन १९९५ ते २००३ हा ग्रंथ विधिमंडळ कामकाज कसे चालते हे समजून घेण्यासाठी उपयुक्त आहे. या ग्रंथामध्ये

पाच प्रकरणे आहेत. त्यामध्ये पहिल्या प्रकरनात महाराष्ट्र राज्य निर्मितीचा धावता व संक्षिप्त आढावा घेण्यात आलेला आहे. यामध्ये महाराष्ट्राची उत्पत्ती, महाराष्ट्र नावाचा इतिहास या सर्व अभ्यासल्या आहेत. तर प्रकरण दुसरे महाराष्ट्र राज्याचा विधिमंडळ निर्मितीचा प्रवास माडण्यात आला आहे. महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर कशाप्रकारे महाराष्ट्र विधिमंडळ हे विकसित होत गेले याविषयी विवेचन करण्यात आलेले आहे. तिसऱ्या प्रकरणात महाराष्ट्र विधिमंडळाच्या कामकाजाच्या प्रक्रियेवर आणि एकूण कामकाजाच्या पद्धतीचे त्यांनी अध्ययन केले आहे. प्रकरण चारमध्ये १९६० ते २००३ पर्यंत विधिमंडळाचे कामकाज याविषयी विस्तृत विवेचन करण्यात आलेले आहे. तर प्रकरण पाच मध्ये महाराष्ट्र विधिमंडळाच्या मागील पन्नास वर्षाच्या प्रवासाचा आढावा घेण्यात आलेला आहे. लेखकाने असे म्हटले आहे की, एकूण अधिवेशनामध्ये उन्हाळी अधिवेशनापेक्षा हिवाळी अधिवेशनात कामकाज कमी तर होतेच शिवाय या अधिवेशनाकडे औपचारिकता म्हणून बघितल्या जात असल्याचे एकूण कामकाजाच्या अध्ययनावरून सांगता येते. महाराष्ट्र विधीमंडळाचा विकास लोकप्रतिनिधी कशा प्रकारे विधिमंडळाच्या कामकाज प्रक्रियेत भाग घेतात हे समजून घेण्यासाठी हा ग्रंथ उपयुक्त आहे.

३) **देशमुख रा. नी.**

यांनी लिहिलेल्या आपला हिंगोली जिल्हा या पुस्तकात सपूर्ण हिंगोली जिल्ह्यावर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. हिंगोली जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी हिंगोली या नावाची उत्पत्ती, हिंगोली जिल्ह्याची निर्मिती तसेच सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक स्थितीवर विस्तृत लिखाण करण्यात आलेले आहे. हिंगोली जिल्ह्याची एकूणच समग्र पार्श्वभूमी समजून घेण्यासाठी हे पुस्तक उपयुक्त आहे.

४) **बेलवडी एस. एच.**

यांनी लिहिलेल्या Maharashtra Legislative Assembly Fifty Years (१९३७-८६) Genesis Growth and Work पुस्तकात महाराष्ट्र विधानसभा निर्मितीच्या

ऐतिहासिक पार्श्वभूमीचा आढावा घेतला आहे. १९३५ चा कायदा आणि महाराष्ट्र विधानसभेच्या द्विगृही कायदे मंडळाची निर्मिती, बुद्धाच्या संघातील कार्यपद्धती ही महाराष्ट्र विधिमंडळ कामकाजात असलेली दिसते. हा संदर्भ या पुस्तकात आढळतो तसेच विधानसभेतील कार्यवाही, सभागृहाचे नियम, अर्थ विधेयक, अंदाज पत्रक, राज्यपाल अभिभाषण इ. बाबीवर विस्तृत विवेचन आढळते. महाराष्ट्र विधानसभेची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजून घेण्यात हे पुस्तक उपयुक्त आहे.

५) डॉ. खेकाळे

यांचे नेतृत्व या विषयावर डॉ खेकाळे अध्ययन सखोल, सर्वांगीण व बहुआयामी आहे. हे प्रस्तुत प्रबंधावरून दिसून येते. त्यावरूनच हेही ध्यानात येते की, या विषयाच्या कोणत्याही पैलूविषयी सर्वसाधारण नियम बनविणे वा निष्कर्ष काढणे योग्य होणार नाही. 'नेतृत्वा' च्या व्याख्येपासून तो त्याच्या फलश्रुतिपर्यंत. धर्मअंतर्गत राजदंड ही कल्पना मैकियाव्हॅलीला किवा पश्चिमेतील आजच्या भौतिकतावादी राजनेत्यांना पसंत पडावयाची नाही, तर कसेही करून सत्ताप्राप्ती हे ध्येय आमच्या देशातील राजर्षींना मान्य व्हावयाचे नाही.

६) **के.टी. गिरमे**

यांनी 'विधानसभा परिचय आणि कामकाज' या पुस्तकात भारतीय राज्यघटनेतील कलमावर प्रकाश टाकला आहे. विधानसभेची निर्मीती, विधानसभेच्या बैठका, कामकाज पध्दतीं, राज्यपालाचे अभिभाषण, विधिनियम, प्रश्नोत्तराचा तास, विधानसभेतील चर्चा यावर सविस्तर विश्लेषण केलेले दिसून येते. विधानसभेच्या उपसमिती, अदाज समिती, आश्वासन समिती, अंदाज समिती, पंचायतराज समिती, सार्वजनिक उपक्रम समिती, रोजगार हमी समिती व या समित्यांची कार्यपध्दती याचे सविस्तर विश्लेषण प्रस्तुत पुस्तकात केलं आहे.

७) विलास पाटील

यांनी 'राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखा' या महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालय प्रकाशित पुस्तकामध्ये प्रधान सचिव विलास पाटील यांनी विविध संसदीय आयुधे आणि कायदा तयार करण्याची प्रक्रिया यावर विश्लेषण केले आहे. विधानसभेची रचना, कार्यपध्दती, विधानसभेच्या विविध समित्या, विधानसभा सदस्यांचं विशेषाधिकार, संसदीय आयुधामध्यं तारांकित प्रश्न, अतारांकित प्रश्न, लक्षवेधी यावर भाष्य केले आहे.

८) सुभाष कश्यप

यांच्या 'हमारी संसद' या पुस्तकात भारतीय संसदीय पध्दतीवर लिखाण केलेले आहे. त्यामध्ये भारतीय संसदीय शासन पध्दतीचा उदय, विकास, भारतीय संसदेची निर्मिती, निवडणूक पध्दती, संसदेच्या दोन्ही सभागृहाची बैठक, सभागृहाची कामकाज पध्दती, सभागृहाचे अध्यक्ष उपाध्यक्ष यांचे कार्य, नेमणूक, घटना विधेयक, अंदाजपत्रक, संसदीय समित्या, प्रश्नोत्तराचा तास, तारांकित प्रश्न, अतारांकित प्रश्न इ. बाबतची माहीती या पुस्तकात मिळते.

९) सिसोदिया यतेंद्रसिंह

यांनी इ. स. २००० मध्ये लिहिलेल्या 'पंचायतो एंव अनुसुचित जाती महिला नेतृत्व' या ग्रंथात मध्यप्रदेशमधील पंचायत राज व्यवस्थेतील अनुसूचित जातीतील महिला नेतृत्वाचा अभ्यास केला आहे. ७३ व्या घटनादुरुस्तीनंतर महिलांना पंचायतराज संस्थांत आरक्षणाची तरतूद झाल्यामुळे राजकारणात सहभागी होण्याची संधी मिळाली आहे. त्यामुळ पंचायतराज संस्थाना खऱ्या अर्थाने लोकशाही स्वरुप प्राप्त झाले आहे. लेखकाने १८८ मागासवर्गीय महिला सरपंचाची निवड करुन ग्रामीण विकासातील त्यांच्या योगदानाचा अभ्यास करुन निष्कर्ष काढला आहे. लोकशाही पंरपराच मजबूतीकरण, सामाजिक न्याय व संधीची समानता या बाबीना मृतं स्वरुप प्राप्त करुन देण्यासाठी आरक्षणाच्या माध्यमातून मागासवर्गीय महिला राजकारणात सहभागी झाल्या आहेत. त्यामुळे ग्रामीण विकास, सामाजिक न्याय या सारखे उदिष्टे साध्य होत आहे.

१०) श्री. जो. शहा

"Politics of scheduled cast and tribes' हा ग्रंथ १९७५ मध्ये श्री. जो. शहा यांनी लिहिला. त्यामध्ये त्यांनी गुजरात राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या विविध प्रश्नावर भाष्य केले आहे. हा ग्रंथ प्रस्तुत संशोधनासाठी अतिशय मार्गदर्शक ठरला आहे. १९७१ च्या निवडणुकीनंतर अनुसुचित जाती जमातीच्या ६४४ व्यक्तिच्या मुलाखती घेऊन निष्कर्ष मांडण्यात आले आहे. गुजरातमधील अनुसुचित जाती जमातीच्या आंदोलनाचे ऐतिहासिक स्वरुप, त्यांचा धार्मिक व राजकीय जीवनातील सहभाग व त्यांच्या सहभागाचे स्वरुप कोणत्या प्रकारचे आहे. राजकीय व्यवस्थेबदल त्यांचा दृष्टिकोन कसा आहे यासारख्या विविध घटकाचे शास्त्रशुध्द पध्दतीन सविस्तर विवेचन केले आहे. हे विवेचन संशोधनासाठी व अनुसूचित जाती जमातीचा राजकीय सहभाग जाणून घेण्यासाठी मार्गदर्शक आहे".

११) डॉ सुरेश मिश्रा आणि राजवीर ढाका

'Rural Leadership in Hariyana margin pattern third concept an international Journal of ideas' या ग्रंथात डॉ सुरेश मिश्रा आणि राजवीर ढाका यांनी में २००० मध्ये हरियाणा या राज्यात झालेल्या पंचायतराज संस्थांच्या निवडणूकीमध्ये निवडून आलेल्या १० जिल्हयातील ५० गट आणि २५०० ग्रामपंचायतीमधील एकूण २५०६३ पुरुष व महिला प्रतिनिधीचा अभ्यास करुन काही निष्कर्ष मांडले आहेत. या निवडणुकीमध्ये ग्रामीण भागातील उच्च जातीचाच प्रभाव अधिक आहे हे विशद केले आहे. तसेच प्रतिनिधीच्या वयोगटाचाही विचार केला आहे. शिक्षणाच्या दृष्टिकोनातून विचार केला असता ४०.९४ टक्के प्रतिनिधी पूर्णपणे अशिक्षीत आहेत. व्यवसायाच्या दृष्टीने प्रतिनिधीचा विचार केला असता एकूण प्रतिनिधीपैकी केवळ २५३ प्रतिनिधीचे वार्षिक सरासरी उत्पन्न १० ते १५ हजार एवढे आहे.

१.१२ प्रकरणाची रुपरेषा (Chapter Planning)

प्रस्तुत संशोधन विषयाचे पैलु लक्षात घेऊन अभ्यासाकरीता प्रकरण मांडणी सहा प्रकरणामध्ये केलेली आहे. ती पुढील प्रमाणे-

प्रकरण १ - प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणात प्रस्तावना, संशोधन समस्या, विषयाचे महत्व, उद्दिष्ट्ये, गृहितके, अभ्यासाची व्याप्ती, अभ्यासाच्या मर्यादा, संशोधन पद्धती, नमुना निवड, तथ्य संकलन, तथ्य विश्लेषण, पूर्व संशोधन साहित्याचा आढावा, प्रकरणाची रूपरेषा इत्यादी घटकांचे विवेचन करण्यात आले आहे.

प्रकरण २ - हिंगोली जिल्हा एक दृष्टीक्षेप

प्रस्तुत प्रकरणात प्रस्तावना, हिंगोली जिल्ह्याची भौगोलिक स्थिती, ऐतिहासिक पार्श्वभूमी, सामाजिक जीवन , सांस्कृतिक जीवन, आर्थिक जीवन, शैक्षणिक स्थिती , राजकीय स्थिती व प्रशासकीय क्षेत्रातील पार्श्वभूमीचा आढावा घेण्यात आला आहे

प्रकरण ३ - राजकीय नेतृत्वाची संकल्पना

प्रस्तुत प्रकरणात प्रस्तावना, राजकीय नेतृत्व , नेतृत्वाचा अर्थ, नेतृत्वाचे आधारभूत घटक, नेतृत्वाचे प्रकार, यशस्वी नेतृत्वाची वैशिष्ट्ये, नेतृत्वाचा भारतातील विकास, भारतीय नेतृत्व व पाश्चात्य नेतृत्व यातील फरक, नेतृत्वाचे स्त्रोत, नेतृत्वाचे कार्य, नेतृत्वाचे बदलते स्वरूप, नेतृत्वाचे महत्व इत्यादी घटकाचा अभ्यास केला आहे.

प्रकरण ४ - हिंगोली जिल्हांतर्गत विधानसभेतील राजकीय नेतृत्व व त्यांचे कार्य

प्रस्तुत प्रकरणात हिंगोली जिल्हांतर्गत अंतर्गत समाविष्ट होणाऱ्या विधानसभेतील नेतृत्वाने सन १९९९ ते २००४ तसेच २००४-२००९ दरम्यान केलेल्या कार्याचा अभ्यास करण्यात आहे. हा अभ्यास करत असताना त्यांच्याकडून मुलाखत अनुसूचीव्दारे आणि इतर दुय्यम साधनाव्दारे माहिती संकलित करून प्रकरणाची मांडणी केली आहे. या प्रकरणात सर्वप्रथम प्रस्तावना, विधानसभा निर्मिती, हिंगोली जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघ , मतदारसंघाचा मागील ऐतिहासिक आढावा , हिंगोली विधानसभा मतदारसंघातील नेतृत्व

व त्यांचे राजकीय व सामाजिक कार्य, वसमत मतदारसंघातील नेतृत्व व त्यांचे राजकीय व सामाजिक कार्य, कळमनुरी मतदारसंघातील नेतृत्व व त्यांचे राजकीय व सामाजिक कार्य याचा अभ्यास करण्यात आला आहे

प्रकरण ५ - राजकीय नेतृत्वाप्रती असणारी लोकभावना

प्रस्तुत प्रकरणात नागरिकांची नेतृत्वाप्रतीची लोकभावना जाणून घेण्यात आली आहे. या प्रकरणात सर्वप्रथम प्रस्तावना, नमुना निवड केलेल्या नागरिकांची संख्या ,लिंग, त्यांचे वय, जात व प्रवर्ग , शिक्षण , धर्म , व्यवसाय ,लोकप्रतिनिधींविषयी लोकभावना , मतदारसंघातील समस्या , पायाभूत सुविधा, महिलांचे प्रश्न, शेतकरी, शेतमजुरांचे प्रश्न, प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न , सिंचन क्षेत्र , पर्यटन क्षेत्र विकास, आमदार निधीचा विनियोग याविषयी नेतृत्वाने केलेली कामगिरी कितपत उपयुक्त आहे ? लोकांच्या उपेक्षांची फलश्रुती कितपत झाली आहे? हे जाणून घेण्याच्या दृष्टीने काही मतदारांच्या मुलाखती घेऊन त्या आधारे निष्कर्षाकडे जाण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रकरण ६ - सारांश, निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तुत प्रकरणात वरील प्रकरणांची सारांश रूपाने मांडणी करून त्या आधारे निष्कर्ष काढण्यात आहे. तसेच काही शिफारशी करण्यात आल्या आहेत .

१) हिंगोली जिल्ह्यांतर्गत विधानसभेतील नेतृत्वाने राबविलेल्या विकास योजनांचा लाभ संबंधित घटकांपर्यंत पोहचत नसल्याचे ६८ टक्के उत्तरदात्यांनी म्हटले आहे .

२) हिंगोली जिल्ह्यांतर्गत विधानसभेतील नेतृत्वास विकास कामासाठी पुरेसा निधी व अधिकार उपलब्ध होत नाही असे सर्वच लोकप्रतिनिधींचे मत आहे.

३) हिंगोली जिल्ह्यांतर्गत विधानसभेतील नेतृत्वाने मिळालेल्या निधीचा योग्य क्षमतेने वापर केलेला नाही असे ६२ टक्के उत्तरदात्यांनी म्हटले आहे.

४) हिंगोली जिल्ह्यांतर्गत विधानसभेतील नेतृत्व विकास कार्यक्रम आखत असतांना त्यात पक्षीय राजकारण व हितसंबंधांना प्राधान्य देते असे ६४ टक्के उत्तरदात्यांनी म्हटले आहे.

५) स्वातंत्र्यानंतर स्वीकारलेल्या नविन राजकीय व्यवस्थेने सर्वसामान्य नागरिकांना राजकीय नेतृत्व करण्याची संधी प्राप्त करून दिली आहे असे सर्वच उत्तरदात्यांनी म्हटले आहे.

६) हिंगोली जिल्ह्यांतर्गत विधानसभेतील नेतृत्वाला विकासात्मक कार्य करतांना अनेक अडचणी येतात येतात असे उत्तरदात्यांनी म्हटलं आहे.

७) हिंगोली विधानसभा मतदारसंघांमध्ये १९९९, २००४ व २००९ च्या निवडणुकीत कॉंग्रेस पक्षाचे प्राबल्य राहिले आहे.

८) वसमत मतदारसंघमध्ये १९९९ च्या निवडणुकीत शिवसेना पक्षाचे प्राबल्य राहिले आहे. २००४, २००९ च्या निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्राबल्य राहिले आहे.

११) कळमनुरी विधानसभा मतदारसंघांमध्ये १९९९ व २००४ च्या निवडणूक मध्ये शिवसेना पक्षाचे प्राबल्य राहिले आहे.

१२) हिंगोली जिल्ह्यांतर्गत १९९९ ते २००९ या काळात दोन निवडणुका झाल्या. यामध्ये हिंगोली विधानसभा मतदारसंघात मराठा प्रभाव राहिला आहे.वसमत विधानसभा मतदारसंघ मारवाडी व मराठा असा संमिश्र प्रभाव राहिला आहे तर कळमनुरी विधानसभा मतदारसंघावर इतर मागास प्रवर्गाचा प्रभाव राहिला आहे.

१३) हिंगोली जिल्ह्यांतर्गत येणाऱ्या हिंगोली ,वसमत व कळमनुरी या विधानसभा मतदार संघात शिक्षण, आरोग्य ,पिण्याचे पाणी, सिंचन क्षेत्र, रस्ते इत्यादी समस्या अध्यापपर्यंत पूर्णपणे संपल्या नसल्याचे लोकप्रतिनिधींनी मान्य केले आहे .

१४) हिंगोली जिल्ह्यात सक्षम व प्रभावी राजकीय नेतृत्व नसल्याने हिंगोली जिल्ह्यांतर्गत विकास योजनांसाठी शासकीय निधी हा अत्यल्प मिळत असल्याचे दिसून येते.

१५)   जिल्हा अंतर्गत असणाऱ्या तिन्ही विधानसभा मतदारसंघातील लोकप्रतिनिधीची अधिवेशन

काळातील उपस्थिती ही ५० टक्के पेक्षा अधिक आहे.

गृहीतकाची पडताळणी

१) विधानसभेतील नेतृत्वाला कार्य करतांना अनेक अडचणी येतात.हे गृहीतक सत्य ठरले आहे

महाराष्ट्र विधानसभेमध्ये हिंगोली जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करीत असताना आमदारांना स्थानिक स्तरावरील अडचणीचा सामना करावा लागतो हे सारणी क्रमांक ५. ८ वरून सत्य ठरते. तसेच पक्षीय स्तरावरील अडचण येते हे सारणी क्रमांक ५. ११, ५. १२ वरून सिद्‍ध होते.

२) नेतृत्वाने राबविलेल्या विकास योजनांचा लाभ संबंधित घटकांपर्यंत पोहचत नाही. हे गृहीतक सत्य ठरले आहे.

महाराष्ट्र विधानसभेमध्ये हिंगोली जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करीत असताना राजकीय नेतृत्वाने मतदारसंघात राबविलेल्या विकास योजनाचा लाभ सर्वसामान्य माणसापर्यंत पूर्णपणे पोहचत नाही .जो लाभ मिळतो तो अत्यल्प असतो. यामुळे मतदारसंघातील जनतेचा अपेक्षित विकास झाला नाही. हे हे सारणी क्रमांक ४. ७,४.१३,४.१४,४.२१,४.२३,४.३० वरून सत्य ठरते.

३) विधानसभेतील नेतृत्वास विकास कामासाठी पुरेसा निधी व अधिकार उपलब्ध होत नाही तसेच हे नेतृत्व मिळालेल्या निधीचा योग्य क्षमतेने वापर करू शकत नाही.हे गृहीतक सत्य ठरले आहे.

हिंगोली हा नवीन व अत्यंत लहान जिल्हा आहे. पक्षीय व राजकीय दृष्ट्या प्रभावी राजकीय नेतृत्व जिल्ह्यात नाही. अस्तित्वात असलेले नेतृत्व इतरांवर अवलंबून असल्याने विधानसभेमध्ये हिंगोली जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करीत असताना राजकीय नेतृत्वाला विकास कामासाठी पुरेसा निधी व अधिकार मिळत नाहीत हे सारणी क्रमांक ४. ८,४.९,४.१०,५.८,५.१५,५.१६ वरून सत्य ठरते.

४) विधानसभेतील नेतृत्व विकास कार्यक्रम आखत असतांना त्यात पक्षीय राजकारण व हितसंबंधांना प्राधान्य देते.हे गृहीतक सत्य ठरले आहे.

हिंगोली जिल्ह्यात पक्षीय व राजकीयदृष्ट्या प्रभावी राजकीय नेतृत्व अस्तित्वात नाही. असलेले नेतृत्व इतरांवर अवलंबून असल्याने विधानसभेमध्ये हिंगोली जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करीत असताना राजकीय नेतृत्वाला विकास कामासाठी पुरेसा निधी मिळत नाही. तसेच पक्षीय राजकारण व हितसंबंधांना प्राधान्य देऊन विकास कामासाठी निधी वाटप होत असल्याने हिंगोली जिल्ह्याच्या वाट्याला फारसे काही येत नाही. यामुळे अनेक चांगल्या विकास योजना, मदत जिल्यातील नागरिकांना मिळत नाही . यावरून वरील गृहीतक सत्य ठरते. हे सारणी क्रमांक ४.२७,४.२८,४.२९,४.३०,५.२५,५.२३,५.२७ वरून सत्य ठरते.

५) स्वातंत्र्यानंतर स्वीकारलेल्या नविन राजकीय व्यवस्थेने सर्वसामान्य नागरिकांना राजकीय नेतृत्व करण्याची संधी प्राप्त करून दिली आहे.हे गृहीतक सत्य ठरले आहे.

हिंगोली जिल्हा हा नवनिर्मित जिल्हा आहे . स्वातंत्र्यानंतर भारतामध्ये स्वीकारलेल्या संसदीय लोकशाही व्यवस्थेमध्ये जनतेचा सहभाग महत्वाचा मानला आहे. यामुळे सामान्यातल्या सामान्य माणसाला राजकीय सहभाग व प्रतिनिधित्वाची संधी उपलब्ध झाली आहे. याला हिंगोली जिल्हा अपवाद नाही . जिल्यामध्ये अनेक ग्रामीण माणसाला विधानसभा सदस्य म्हणून कार्य करण्याची संधी मिळाली आहे यावरून वरील गृहीतक सत्य

ठरते. हे सारणी क्रमांक ४.३१,४.३२,४.३३,४.३४,५.२८,५.२९,५.३० वरून सत्य ठरते.

शिफारशी

१) लोकप्रतिनिधीने विधानसभेच्या प्रत्येक अधिवेशनानंतर स्वतःच्या संकेतस्थळावर सभागृहातील कामाबद्दल माहिती द्यावी.

२) विधानसभा अधिवेशनात मतदारसंघातील प्रश्न मांडण्यापूर्वी नागरिकांकडून मत जाणून घ्यावे.

३) आमदार निधीविषयी माहिती मतदारसंघातील नागरिकांना माहिती करून द्यावी.

४) लोकनिप्रतिनिधीने आमदार निधी शाळा, पिण्याचे पाणी, दुर्गम भागातील महत्वाचे प्रश्न, महिलांचे प्रश्न, वयोवृद्ध नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी खर्च करावा.

६) मतदारसंघातील सिंचनक्षेत्र वाढवण्यासाठी प्रयत्न करावेत.

७) आमदारांसाठी कार्यशाळा , प्रशिक्षण वर्ग असावा.

संदर्भ ग्रंथसूची (References)

अ) मराठी संदर्भ ग्रंथ

१) अनुसे,नितीनराजे (२०१८), पुन्हा एक नवी दिशा, सांगली, राजे प्रकाशन,

२) कऱ्हाडे,डॉ.बी.एम (२०००),शास्त्रीय संशोधन पध्दती, नागपुर, पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स,

३) कुलकर्णी,संजीव (संपादक), संसदरत्न राजीव सातव स्मृतीपुष्प,नांदेड, अभंग पुस्तकालय

४) कोठारी,रजनी, (१९७०) "भारतातील राजकारण", बोस्टन, लिटल ब्राउन.

५) गव्हाणे,डॉ. अजय (२०१४), संसदीय लोकशाहीची आयुधे, नांदेड, क्रिएटिव्ह पब्लिकेशन.

६) गिरमे,के.टी. (१९८३), विधानसभा परिचय आणि कामकाज, व्दितीय आवृती पुणे विद्या प्रकाशन.

७) घोडाळे,रा.ना.,(२००९), समाजशास्त्रीय संशोधन तत्वे व पध्दती, नागपुर, मंगेश प्रकाशन.

८) घांगरेकर,चि.ग., (१९९९), आधुनिक राजकीय विश्लेषण, नागपूर, विद्या प्रकाशन,

९) चौधरी कि. का (संपादक), परभणी जिल्हा गॅझेटियर, मुंबई दार्शनिका विभाग, महाराष्ट्र
शासन, मुंबई,

१०) जाधव, गंगाधर, (२००९), कॉ. विठ्ठलराव नाईक यांच्या कार्याचे राजकीय विश्लेषण: एक
अभ्यास, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, एफ. फील. पदवीकरीता
सादर शोधप्रबंध

११) जाधव तुकाराम (संपादक), महाराष्ट्र वार्षिकी २०१०, युनिक अकॅडमी पुणे,

१२) जेना, बी.बी.,जेबराल.के., (१९८९)"निवडणुकीचे राजकारण आणि भारतात मतदाराची वर्तणूक", डिस्कव्हरी पब्लिशिंग हाऊस, नवी दिल्ली.

१३) जोहरी, जे.सी., (२००२) "भारतीय राजकीय व्यवस्था", अनमोल पब्लिकेशन, नवी दिल्ली.

१४) डोळे, ना.म., (२००६), परराष्ट्र धोरण आपले शेजारी, मुंबई, ग्रंथाली ज्ञानयज्ञ,

१५) पळशीकर, सुहास.,(२००४),समकालीन भारतीय राजकारण, पुणे, प्रतिमा प्रकाशन.

१६) पळशीकर सुहास (२०१३), राजकारणाचा ताळेबंद, पुणे, साधना प्रकाशन.

१७) फुलारी, रा.ना., (२०१४), महाराष्ट्र विधिमंडळ कार्यभाग, नागपूर अधिवेशन (१९९५ ते २००३), अमरावती, मुद्रा प्रकाशन.

१८) दिक्षित, दुर्गा (२००९), महाराष्ट्र संस्कृती प्रथमावृत्ती ,पुणे ,डायमंड पब्लिकेशन.

१९) देशपांडे, श्रीकांत, (२०११) भारताची विदेशनीती, नागपूर, मंगेश प्रकाशन

२०) देवळाणकर, डॉ. शैलेंद्र., (२०१४) भारत आणि जग भारताचे परराष्ट्र धोरण आणि सुरक्षा सम्बध, पुणे, सकाळ प्रकाशन,

२१) वाघ, विलास., (२००२) जातीसंस्थेचे बदलते स्वरुप,पुणे, सुगावा प्रकाशन.

ब) इंग्रजी ग्रंथ

१) E. Goldsmith & N. Hildyard: The Social and Environ- mental Effects of Large Dams. Vol. 1

२) The State of India's Environment - 1982 (Centre for Science & Environment, New Delhi)

३) The State of India's Environment - 1984-85 (Centre for Science & Environment, New Delhi)

४) Ram Ganga Command Area. Agriculture Situation in India, Vol. 42 (9),

५) Deshpande, D.D, and Supe, S.V. (1989). Problems of Farmers in Canal Irrigation.Indian Journal of Agriculture Economics, Vol.44, No.3, July-Sep.

६) Deshpande, D.D, and Supe, S.V. (1989). Problems of Farmers in Canal Irrigation.Indian Journal of Agriculture Economics, Vol.44, No.3, July-Sep.

७) Koli, P.A. and Bodhale, A.C. (2006). Irrigation Development in India. Serials Publications, New Delhi,
८) Ram Ganga Command Area. Agriculture Situation in India, Vol. 42 (9),
९) Deshpande, D.D, and Supe, S.V. (1989). Problems of Farmers in Canal Irrigation.Indian Journal of Agriculture Economics, Vol.44, No.3, July-Sep.
१०) Koli, P.A. and Bodhale, A.C. (2006). Irrigation Development in India. Serials Publications, New Delhi,

क) शासकीय अहवाल

१) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवाल.

ड) वर्तमानपत्रे

१) लोकमत
२) तरुण भारत
३) महाराष्ट्र टाईम्स
४) देशोन्न्ती
५) लोकसत्ता

इ) वेबसाईट

१) www.election.in
२) www.maharashtra. gov.in
३) www.shodhganga. inflibent.ac.in

संशोधक **सह-मार्गदर्शक** **मार्गदर्शक**

गजानन प्रल्हाद चव्हाण **प्रा.डॉ.आर.डी. शिंदे** **प्रा.डॉ.डी.आर.भागवत**